चाळीस वर्षाहून अधिक काळ नर्तक, नृत्यदिग्दर्शक, शिक्षक, कलादिग्दर्शक म्हणून कार्यरत असलेल्या कथक गुरू शमा भाटे या तालीम आणि अभिनयाचे उत्कृष्ट संगम आहेत. पुण्याच्या नादरूप इन्स्टिटयूटच्या संचालिका शमा भाटे या गुरू श्रीमती रोहिणी भाटे यांच्या शिष्या आहेत.

## स्मृतिगंध

स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतींना उजाळा देतील त्यांचे शिष्य.



सूत्र संचालन : जयंत पात्रीकर



मनिषा पाध्ये-पात्रीकर



अमिता राजूरकर-दंडिगे



मंजूषा सोनबरसे-हनकरे



### निलाक्षी सक्सेना, कथक नृत्यांगना

डॉ. साधना नाफडे यांच्याकडे सुरुवातीच्या काळात कथक नृत्यांच्या प्रशिक्षण घेतल्यानंतर जयपूर घराण्याचे पं. रार्जेद्र गंगाणी यांच्याकडून कथकची तालीम घेणा-या निलाक्षी सक्सेना दिल्ली दूरदर्शनच्या 'ए-ग्रेड' कलाकार आहेत. निलाक्षी यांना सांस्कृतिक मंत्रालय व सीसीआरटीची शिष्यवृत्ती मिळालेली आहे.



### डॉ. श्वेता पेंडसे, कथक नृत्यांगना, अभिनेत्री, लेखिका

डॉ. श्वेता पेंडसे यांनी मराठी व हिंदी टेलिव्हिजनवर आपल्या अभिनय कौशल्याने स्वत:चा वेगळा चाहता वर्ग तयार केला. काव्य लेखन, नाट्य लेखनात रमणा-या डॉ. श्वेता यांनी काही लघुपटांसाठीही संहिता लेखन केले असून दर्जेदार लिखाणासाठी त्यांचे बरेच कौतूकही झाले आहे.



### जयंत गाडेकर, अभिनेता, लेखक, दिग्दर्शक

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे विद्यार्थी जयंत गाडेकर यांनी नाटक, चित्रपट, टीव्ही आणि जाहिराती अशा विविध माध्यमांमध्ये काम केले आहे. 'पापी पेट का सवाल', 'गंध', 'इस दिन, इस वक्त' इत्यादी मराठी व हिंदी नाटकांचे लेखन व दिग्दर्शन केले आहे.






गजरा चित्रपटाचे दिग्दर्शक विनीत शर्मा व कलाकार जयंत गाडेकर ह्यांच्या उपस्थितीत प्रदर्शन

www.nirzar.org | 9766589451

---

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने

# Kathak Sadhana

**२९ डिसेंबर २०२१ - सायंकाळी ७ ते ९ वाजेदरम्यान**

## साधना स्मृती स्मरणिकेचे प्रकाशन



अध्यक्ष

**सौ. कांचन गडकरी,**

अध्यक्ष,

विदर्भ प्रांत संस्कार भारती



प्रमुख पाहुणे

**पं. राजेंद्र गंगाणी**

प्रसिद्ध कथक नर्तक व गुरू

## कृष्णांगी

-प्रसिद्ध कथक नृत्यांगना निलाक्षी सक्सेना व प्रियंका श्रीकृष्णन यांची कथक नृत्यनाटिका



चित्रा बॅनर्जी लिखित पुस्तक 'पॅलेस ऑफ इल्युजन' ने प्रेरित होऊन भगवान कृष्ण आणि द्रौपदी यांच्यातील भावनिक व बौद्धीक बंध कथक नृत्याच्या माध्यमातून कृष्णांगी द्वारे प्रस्तुत करण्यात आलेले आहे. प्रियंका श्रीकृष्णन यांची संकल्पना असलेल्या या नृत्यनाटिकेचे संहिता लेखन, नृत्यदिग्दर्शन प्रियंका श्रीकृष्णन व निलाक्षी सक्सेना यांनी केले आहे.

www.nirzar.org | 9766589451

# गुरू साधना नाफडे यांचे अंतरंग विशाल हो

## शिष्यांचा 'स्मृतगिंध' दरवळला; 'कथक साधना' महोत्सवाला प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २८ : कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे आई, मैत्रीण आणि गुरू होत्या. त्या अतिशय शिस्तप्रिय होत्या. आपल्या शिष्यांना दुस-या गुरूकडे शिकायला पाठवण्याइतके त्यांचे अंतरंग विशाल होते, अशा भावना साधना नाफडे यांच्या शिष्यांनी व्यक्त केले.

भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाला मंगळवारी सकाळी कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या कार्यशाळेने प्रारंभ झाला. निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटनिम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलिफ असोसएिशन, नागपूर येथे हा तीन दिवसीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतींना उजाळा देणारा 'स्मृतिगंध' हा कार्यक्रम पार पडला. यात अभिनेता, लेखक, दिग्दर्शक जयंत गडेकर, कथक नृत्यांगना अभिनेत्री व लेखिका डॉ. श्वेता पेंडसे, कथक नृत्यांगना निलाक्षी सक्सेना, मनिषा पाध्ये - पात्रीकर, अमिता राजूरकर-दंडिगे व रोशन आवळे या शिष्यांनी सहभाग घेतला.



**नागपूर : कथक साधना महोत्सवाला मंचावर उपस्थित साधना नाफडे यांचे शिष्य आणि मान्यवर.**

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत पात्रीकर यांनी केले. दिग्दर्शक विनित शर्मा यांच्या प्रमुख उपस्थिती होती. गुरू ललिता हरदास यांच्या

**आज र**
सायंकाळ
भारतीच्य
कांचन ग
स्मृती' य
होणार अ
गंगाणी य
राहील. य
कथक नृ
सक्सेना
'कृष्णांगी
करतील.

यांच्या विद्
सादर केले.

# त्यांनी घडविले अनेकांचे आयुष्य

### साधना नाफडेंच्या शिष्यांनी दिला आठवणींना उजाळा

**म. टा. प्रतिनिधी, नागपूर**

आई आणि मैत्रिणीप्रमाणे सोबत असणाऱ्या कथक गुरू साधना नाफडे यांनी अनेकांचे आयुष्य घडविले, अशी भावना त्यांच्या शिष्यांनी मंगळवारी व्यक्त केली.

भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रसारक, कथक गुरू डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाला मंगळवारी सकाळी कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या कार्यशाळेने प्रारंभ झाला. निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने प्लॅटिनम ज्युबिली सभागृहात तीन दिवसीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात साधना नाफडे यांच्या स्मृतींना उजाळा देणारा 'स्मृतिगंध' हा कार्यक्रम पार पडला. यात अभिनेते जयंत गडेकर, नृत्यांगना तथा अभिनेत्री डॉ. श्वेता पेंडसे, कथक नृत्यांगना नीलाक्षी सक्सेना, मनीषा पाध्ये-पात्रीकर, अमिता राजुरकर-दंडिगे आणि रोशन आवळे सहभागी झाले होते.



**'कथक साधना' महोत्सवात नृत्य सादर करताना कलावंत.**

'डॉ. नाफडे यांचे बोट धरून कथक नृत्य करायला लागले आणि आतापर्यंत करीत आहे. त्यांच्या रूपात मला आई, मैत्रीण आणि गुरूही लाभला,' असे मनीषा पात्रीकर यांनी सांगितले. 'पुरुष नर्तकाने कथक करताना काय काळजी घेतली पाहिजे, यातील बारकावे त्यांनी समजावून सांगितले,' असे रोशन आवळे म्हणाले. नीलाक्षी सक्सेना म्हणाल्या, 'त्यांच्यात काहीतरी जादू होती. मी त्यांच्याकडे आकर्षिले गेले. त्यांनी मातीच्या गोळ्याला आकार दिला. पं. राजेंद्र गंगाणी यांच्याकडे शिकायला जाण्याची परवानगी दिली.' अमिता राजुरकर-दंडिगे म्हणाल्या, 'मॅडम अतिशय शिस्तप्रिय होत्या. काही चुकले की त्यांच्या डोळ्यातून ते कळायचे.' 'मॅडमचे व्यक्तिमत्त्व लोहचुंबकासारखे होते,' असे डॉ. श्वेता पेंडसे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयंत पात्रीकर यांनी केले. यावेळी 'गजरा' चित्रपटाचे दिग्दर्शक विनित शर्मा यांची उपस्थिती होती.

2021/12/30 07:27

नवराष्ट्र

सांस्कृतिक | शिष्यांचा 'स्मृतिगंध' दरवळला, 'कथ्थक साधना' महोत्सवाला प्रारंभ

# गुरू साधना नाफडे यांचे अंतरंग होते विशाल

नागपूर, ब्युरो रिपोर्टर. कथ्थक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे आई, मैत्रीण आणि गुरू होत्या. त्या अतिशय शिस्तप्रिय होत्या. आपल्या शिष्यांना दुसऱ्या गुरूकडे शिकायला पाठवण्याइतके त्यांचे अंतरंग विशाल होते, अशा भावना साधना नाफडे यांच्या शिष्यांनी व्यक्त केले.



भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कथ्थक साधना' महोत्सवाला मंगळवारी सकाळी कथ्थक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या कार्यशाळेने प्रारंभ झाला. निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाऊंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटीनम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, नागपूर येथे हा तीन दिवसीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतींना उजाळा देणारा 'स्मृतिगंध' हा कार्यक्रम पार पडला. यात अभिनेता, लेखक, दिग्दर्शक जयंत गडेकर, कथक नृत्यांगना अभिनेत्री व लेखिका डॉ. श्वेता पेंडसे, कथ्थक नृत्यांगना नीलाक्षी सक्सेना, मनीषा पाध्ये-पात्रीकर, अमिता राजूरकर-दंडिगे व रोशन आवळे या शिष्यांनी सहभाग घेतला. मनीषा पाध्ये- पात्रीकर यांनी डॉ. नाफडे यांची पहिली भेट कशी झाली याचा किस्सा सांगितला. मॅडमचे बोट धरून कथ्थक नृत्य करायला लागले आणि आतापर्यंत करत आहे. त्या अतिशय बाहेरून कडक आणि आतून खूप मऊ होत्या. त्या आई, मैत्रीण आणि गुरू होत्या, असे त्या म्हणाल्या. कथक वर्गातल्या घुंगरूच्या आवाजाकडे आकर्षित झालो आणि साधना नाफडे यांच्या नृत्याविष्कार बघून शिकायला लागलो. पुरूष नर्तकाने नृत्य करताना काय काळजी घेतली पाहिजे, हे बारकाईने सांगितले. मला त्यांनी पुढच्या शिक्षणासाठी दुसऱ्या गुरूंकडे शिकायला पाठवले. त्यांचे अंतरंग इतके विशाल होते, असे रोशनने सांगितले. नीलाक्षी म्हणाल्या, त्यांच्याच काहीतरी जादू होती. मी त्यांच्याकडे आकर्षिले गेले. त्यांनी मातीच्या गोळ्याला आकार दिला. पं. राजेंद्र गंगाणी यांच्याकडे शिकायला जाण्याची परवानगी दिली. अमिताने सांगितले की मॅडम अतिशय शिस्तप्रिय होत्या. काही चुकले की त्यांच्या डोळ्यातून ते कळायचे. पण शिष्यांच्या त्या आवडत्या होत्या. श्वेता पेंडसे यांनी साधना नाफडे यांचा उल्लेख चुंबक असा केला. जयंत गडेकर म्हणाले, नागपूर विद्यापीठाकडून युवा महोत्सवात नाटकासाठी निवडला गेलो होतो. तीस लोकांचीच चमू जाणार होती. आमचा ग्रुप डान्समध्ये त्या नृत्यदिग्दर्शक होत्या. त्यावेळी पहिली ओळख झाली होती.

कार्यक्रमाचे संचालन जयंत पात्रीकर यांनी केले. त्यानंतर 'गजरा' चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक विनित शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. गुरू ललिता हरदास यांच्या यांच्या विद्यार्थिनींनी संस्कार भारती गीत सादर केले.

### आज महोत्सवात

सायंकाळी 7 वाजता संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचन गडकरी यांच्या हस्ते 'साधना स्मृती स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे. यावेळी पं. राजेंद्र गंगाणी यांची प्रमुख उपस्थिती राहील. या कार्यक्रमानंतर प्रसिद्ध कथक नृत्यांगना व गुरू निलाक्षी सक्सेना व प्रियंका श्रीकृष्णन 'कृष्णांगी' कथक नृत्यनाटिका सादर करतील.

# गुरू साधना नाफडे यांचे अंतरंग विशाल होते

## मनीषा पाध्ये-पात्रीकर यांचे मत : 'कथ्थक साधना' महोत्सवाला प्रारंभ

लोकशाही वार्ता / नागपूर

कथ्थक गुरू डॉ. साधना नाफडे आई, मैत्रीण आणि गुरू होत्या. त्या अतिशय शिस्तप्रिय होत्या. आपल्या शिष्यांना दुसऱ्या गुरूकडे शिकायला पाठवण्याइतके त्यांचे अंतरंग विशाल होते, असे मत मनीषा पाध्ये-पात्रीकर यांनी व्यक्त केले. भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित कथ्थक साधना महोत्सवाला मंगळवारी सकाळी कथ्थक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या कार्यशाळेने प्रारंभ झाला.

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलिफ असोसिएशन, नागपूर येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात दिवंगत साधना नाफडे यांच्या स्मृतींना उजाळा देणारा स्मृतिगंध हा कार्यक्रम पार पडला.

पुरुष नर्तकाने नृत्य करताना काय काळजी घेतली पाहिजे, हे बारकाईने साधना नाफडे यांनी सांगितले. मला त्यांनी पुढच्या शिक्षणासाठी दुसऱ्या गुरुंकडे शिकायला पाठवले, असे रोशनने सांगितले. श्वेता पेंडसे यांनी साधना नाफडे यांचा उल्लेख चुंबक असा केला. संचालन जयंत पात्रीकर यांनी केले. त्यानंतर गजरा चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक विनित शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. गुरू ललिता हरदास यांच्या विद्यार्थिनींनी संस्कार भारती गीत सादर केले.

# डॉ. नाफडे की स्मृति कथक साधना महोत्सव' का शुभारंभ



## शिष्यों ने साझा किए अनुभव

भास्कर संवाददाता | नागपुर

कथक गुरु डॉ. साधना नाफडे सिर्फ गुरु ही नहीं, बल्कि मां और सहेली भी थीं। वे अनुशासन प्रिय महिला थीं। अपने शिष्यों को दूसरे गुरु से सीखने के लिए भेजती थीं। यह विचार डॉ. नाफडे के शिष्यों ने व्यक्त किए। भारतीय शास्त्रीय नृत्य की प्रचारक व प्रसारक डॉ. स्व. साधना नाफडे की स्मृति में 'कथक साधना महोत्सव' का शुभारंभ मंगलवार को कथक गुरु पं राजेंन्द्र गंगाणी की कार्यशाला से शुरु हुआ। निर्झर कला संस्थान, गुरु साधना फाउंडेशन व संस्कार भारती के संयुक्त तत्वावधान में प्लेटिनम जुबली सभागृह ब्लाइंड रिलीफ एसोसिएशन में तीन दिवसीय महोत्सव का आयोजन किया गया है। कार्यक्रम के दूसरे चरण में स्मृतिगंध का आयोजन किया गया, जिसमें अभिनेता व निर्देशक जयंत गडेकर, कथक नृत्यांगना व लेखिका डॉ. श्वेता पेंडसे, कथक नृत्यांगना नीलाक्षी सक्सेना, मनीषा पात्रीकर, अमिता दंडिगे व रोशन आवले शामिल थे। गुरु ललिता हरदास के विद्यार्थियों ने संस्कार भारती गीत प्रस्तुत किया। संचालन जयंत पात्रीकर ने किया।

### आज 'साधना स्मृति स्मरणिका' का विमोचन

बुधवार को शाम 7 बजे संस्कार भारती विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचन गडकरी के हाथों 'साधना स्मृति स्मरणिका' का विमोचन किया जाएगा। पं. राजेंद्र गंगाणी की प्रमुख उपस्थिति रहेगी। कार्यक्रम के बाद कथक नृत्यांगना नीलाक्षी सक्सेना व प्रियंका श्रीकृष्णन 'कृष्णांगी' कथक नृत्यनाटिका प्रस्तुत करेंगी।

---

महिला - सांस्कृतिक

# 'कृष्णांगी'ने रसिक भारावले

देशोन्नती वृत्तसंकलन...

नागपूर ■ डॉ. साधना नाफडे यांचे व्यक्तिमत्त्व शास्त्रीय नृत्य शिकणाऱ्या सर्वांसाठी प्रेरणादायी होते. त्यांचे कामाप्रती असलेले समर्पण वाखाणण्यासारखे होते. साधनेच्या त्या उत्तम प्रतिक होत्या. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कथक साधना' स्मरणिका प्रकाशित करण्याचा उपक्रम स्तुत्य असून त्या माध्यमातून त्यांच्या साधनेचे अनुकरण करणे शिष्यांना सोपे जाईल, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांनी केले.

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्त वतीने प्लटिनियम ज्युबली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसिएशन येथे भारतीय शास्त्रीय नृत्याचे प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'कथक साधना' स्मृती स्मरणिकेचे पं. राजेंद्र गंगाणी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी मंचावर अभिनेते, लेखक व दिग्दर्शक जयंत गडेकर, अभिनेत्री व लेखिका श्वेता पेंडसे, संस्कार भारतीचे प्रांत अध्यक्ष वीरेन चांडक, पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, निर्झर कला संस्थानचे समीर नाफडे, मनीषा पाध्ये - पात्रीकर, अमिता राजूरकर-दंडिगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

समीर नाफडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, माझी आई साधना नाफडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांचे लेख या स्मरणिकेत आहेत. सर्व लेख अतिशय वाचनीय असून शिष्यांसाठी प्रेरणादायी आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता गर्गे यांनी केले. तत्पूर्वी, कथक गुरू स्वाती भालेराव यांच्या शिष्यांनी ध्येयगीतावर कथक नृत्य सादर केले.



### प्रियंका श्रीकृष्णनचे सादरीकरण

चित्रा बॅनर्जी लिखित पुस्तक पॅलेज ऑफ इल्युजनने प्रेरित होऊन भगवान श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांच्यातील आत्मिक, भावनिक व बौद्धिक बंध कथक नृत्याच्या माध्यमातून कथक नृत्यांगना निलाक्षी सक्सेना व प्रियंका श्रीकृष्णन यांनी सादर केले. प्रियंका यांची संकल्पना असलेल्या या नृत्यनाटिकेचे संहिता लेखन, नृत्यदिग्दर्शन निलाक्षी व प्रियंका यांचे होते. त्यांच्या नृत्याने रसिक भारावून गेले.

---

8:01 AM | 0.1KB/s

epaper.navarashtra.com/

नवराष्ट्र

# डॉ. नाफडे साधनेचे प्रतिक होत्या

### पं. राजेंद्र गंगाणी यांचे प्रतिपादन

नागपूर, ब्युरो रिपोर्टर. डॉ. साधना नाफडे यांचे व्यक्तिमत्व शास्त्रीय नृत्य शिकणा-या सर्वांसाठी प्रेरणादायी होते. त्यांचे कामाप्रती असलेले समर्पण वाखाणण्यासारखे होते. साधनेच्या त्या उत्तम प्रतिक होत्या, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांनी केले. निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटनिम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसएिशन येथे भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाच्या दुस-या दिवशी 'कथक साधना' स्मृती स्मरणिकेचे पं. राजेंद्र गंगाणी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी मंचावर अभिनेते, लेखक व दिग्दर्शक जयंत गडेकर, अभिनेत्री व लेखिका श्वेता पेंडसे, संस्कार भारतीचे प्रांत अध्यक्ष विरेन चांडक, पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, निर्झर कला संस्थानचे समीर नाफडे, मनिषा पाध्ये - पात्रीकर, अमिता राजूरकर-दंडिगे यांची प्रमुख उपस्थति होती.

### 'कृष्णांगी'ने जिंकले

चित्रा बॅनर्जी लिखित पुस्तक पॅलेज ऑफ इल्युजनने प्रेरित होऊन भगवान श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांच्यातील आतमिक, भावनिक व बौद्धिक बंध कथक नृत्याच्या माध्यमातून कथक नृत्यांगना निलाक्षी सक्सेना व प्रियंका श्रीकृष्णन यांनी सादर केले. प्रियंका यांची संकल्पना असलेल्या या नृत्यनाटिकेचे संहिता लेखन, नृत्यदिग्दर्शन निलाक्षी व प्रियंका यांचे होते. त्यांच्या नृत्याने रसिक भारावून गेले.

### आज समारोप

सायंकाळी 7 वाजता प्रसिद्ध तबला वादक रिम्पा शिवा यांचे सोलो तबला वादनाने महोत्सवाचा समारोप.

नागपूर दिनांक | लोकसत्ता

## प्रिन्सेस ऑफ तबला



निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाऊंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय कथक साधना महोत्सवात गुरुवारी प्रिन्सेस ऑफ तबला या नावाने सुपरिचित असलेल्या रिम्पा शिवा यांच्या तबलावादनाने सभागृह मंत्रमुग्ध झाले. संवादिनीवर श्रीकांत पिसे यांनी साथसंगत केली.

नवराष्ट्र

# रिम्पा शिवाची तबल्यावर थिरकली बोटे

## 'कथ्थक साधना' महोत्सवाचा समारोप

**नागपूर.** 'प्रिन्सेस ऑफ तबला' नावाने सुपरिचित असलेल्या रिम्पा शिवा यांची तबल्यावर अशी काही बोटे थिरकली की संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. रिम्पा यांच्या कडकडीत तबला वादनाने 3 दिवसीय कथ्थक साधना महोत्सवाचा समारोप झाला. निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसिएशन येथे भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध तबला वादक रिम्पा शिवा यांचे सोलो तबला वादन झाले. फरुखाबाद घराण्याच्या तबला वादक असून त्यांचे देशविदेशात अनेक कार्यक्रम झाले आहेत. त्यांना लहऱ्यावर श्रीकांत पिसे यांनी साथसंगत केली. संस्कार भारतीचे चंद्रकांत घरोटे यांनी त्यांचे स्वागत केले.रिम्पा शिवा यांनी तीनतालात पेशकाराने तबला वादनाला प्रारंभ केला. त्यालाच जोडून त्यांनी फरुखाबाद घराण्याचे कायदे सादर केले. तबल्यावरील कडक थाप, वेगाने थिरकणारी बोटे, तालावरची पकड सर्वांनाच अद्वितीय आनंद देऊन गेली. त्यांनी गत, तोडे, पेशकार सादर करीत रसिकांच्या भरभरून टाळ्या घेतल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन रानडे यांनी केले. तत्पूर्वी, कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या तीनदिवसीय कथक कार्यशाळेचा समारोप झाला.

## महिला - सांस्कृतिक

# रिम्पा शिवाची तबल्यावर थिरकली बोटे

### 'कथक साधना' महोत्सवाचा समारोप

देशोन्नती वृत्तसंकलन...



**नागपूर** ■ 'प्रिन्सेस ऑफ तबला' नावाने सुपरिचित असलेल्या रिम्पा शिवा यांची तबल्यावर अशी काही बोटे थिरकली की संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. रिम्पा यांच्या कडकडीत तबला वादनाने तीन दिवसीय कथक साधना महोत्सवाचा समारोप झाला.

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटनिम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसिएशन येथे भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध तबला वादक रिम्पा शिवा यांचे सोलो तबला वादन झाले. फरूखाबाद घराण्याच्या तबला वादक असून त्यांचे देशविदेशात अनेक कार्यक्रम झाले आहेत. त्यांना लहऱ्यावर श्रीकांत पिसे यांनी साथसंगत केली. संस्कार भारतीचे चंद्रकांत घरोटे यांनी त्यांचे स्वागत केले.

रिम्पा शिवा यांनी तीनतालात पेशकाराने तबला वादनाला प्रारंभ केला. त्यालाच जोडून त्यांनी फरुखाबाद घराण्याचे कायदे सादर केले. तबल्यावरील कडक थाप, वेगाने थिरकणारी बोटे, तालावरची पकड सर्वांनाच अद्वितीय आनंद देऊन गेली. त्यांनी गत, तोडे, पेशकार सादर करीत रसिकांच्या भरभरून टाळ्या घेतल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन रानडे यांनी केले. तत्पूर्वी, कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या तीन दिवसीय कथक कार्यशाळेचा आज समारोप झाला. त्यांच्या हस्ते सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यशाळेत तबल्यावर राम ढोक, संवादिनीवर संदीप गुरनुले व गायनासाठी मंजरी वैद्य यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता गर्गे यांनी केले.

## न्यूज इनबॉक्स

# तबले पर थिरकीं अंगुलियां



**भास्कर संवाददाता|नागपुर.** 'प्रिंसेंस ऑफ तबला' नाम से परिचित रिम्पा शिवा के तबले पर थिरकती अंगुलियों से पूरा सभागृह मंत्रमुग्ध हो गया। निर्झर कला संस्थान, गुरु साधना फाउंडेशन व संस्कार भारती के संयुक्त तत्वावधान में प्लेटिनम जुबली सभागृह ब्लाइंड रिलीफ एसोसिएशन में तीन दिवसीय डॉ. स्व. साधना नाफडे 'कथक साधना' महोत्सव का समापन हआ। फारुखाबाद घराने के तबला वादक रिम्पा ने देश-विदेश में अनेक कार्यक्रम दिए हैं। उनका श्रीकांत पिसे ने साथ दिया। संस्कार भारती के चंद्रकांत घरोटे ने स्वागत किया। कथक गुरु पं. राजेन्द्र गंगाणी की तीन दिवसीय कथक कार्यशाला का भी समापन किया गया। कार्यशाला में तबला पर राम ढोक, संवादिनी पर संदीप गुरनुले व गायन के लिए मंजिरी वैद्य ने संगत की। कार्यक्रम का संचालन श्वेता गर्गे ने किया।

तरुण भारत
Apla Nagpur | 2022-01-03 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# 'कत्थक साधना' महोत्सवाचा समारोप

## रिम्पा शिवा यांचे तबलावादन

◆ **नागपूर, २ जानेवारी**

'प्रिन्सेस ऑफ तबला' नावाने सुपरिचित असलेल्या रिम्पा शिवा यांची तबल्यावर अशी काही बोटे थिरकली की संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. रिम्पा यांच्या तबलावादनाने तीन दिवसीय कत्थक साधना महोत्सवाचा समारोप झाला.

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाऊंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कत्थक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कत्थक साधना' महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध तबलावादक रिम्पा शिवा यांचे एकल तबलावादन झाले. त्या फरुखाबाद घराण्याच्या तबलावादक असून त्यांचे देश-विदेशात अनेक कार्यक्रम झाले आहेत. त्यांना लहऱ्यावर श्रीकांत पिसे यांनी साथसंगत केली. संस्कार भारतीचे चंद्रकांत घरोटे यांनी त्यांचे स्वागत केले. रिम्पा शिवा यांनी तीनतालात पेशकाराने तबलावादनाला प्रारंभ केला. त्यालाच जोडून त्यांनी फरुखाबाद घराण्याचे कायदे सादर केले. तबल्यावरील कडक थाप, वेगाने थिरकणारी बोटे, तालावरची पकड सर्वांनाच अद्वितीय आनंद देऊन गेली. त्यांनी गत, तोडे, पेशकार सादर करीत रसिकांच्या भरभरून टाळ्या घेतल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन रानडे यांनी केले. तत्पूर्वी, गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या तीनदिवसीय कत्थक कार्यशाळेचा समारोप झाला. त्यांच्या हस्ते सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यशाळेत तबल्यावर राम ढोक, संवादिनीवर संदीप गुरनुले व गायनासाठी मंजिरी वैद्य यांनी साथसंगत केली. सूत्रसंचालन श्वेता गर्गे यांनी केले.



◂*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

# रिम्पा शिवाची तबल्यावर थिरकली बोटे

## 'कथक साधना' महोत्सवाचा समारोप



**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ३० : 'प्रिन्सेस ऑफ तबला' नावाने सुपरिचित असलेल्या रिम्पा शिवा यांची तबल्यावर अशी काही बोटे थिरकली की संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. रिम्पा यांच्या कडकडीत तबला वादनाने तीन दिवसीय कथक साधना महोत्सवाचा समारोप झाला.

निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाऊंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, ब्लाइंड रिलीफ असोसएिशन येथे भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कथक साधना' महोत्सवाच्या तिस-या दिवशी प्रसिद्ध तबला वादक रिम्पा शिवा यांचे सोलो तबला वादन झाले. फरुखाबाद घराण्याच्या तबला वादक असून त्यांचे देशविदेशात अनेक कार्यक्रम झाले आहेत. त्यांना लह-यावर श्रीकांत पिसे यांनी साथसंगत केली. संस्कार भारतीचे चंद्रकांत घरोटे यांनी त्यांचे स्वागत केले.

रिम्पा शिवा यांनी तीनतालात पेशकाराने तबला वादनाला प्रारंभ केला. त्यालाच जोडून त्यांनी फरुखाबाद घराण्याचे कायदे सादर केले. तबल्यावरील कडक थाप, वेगाने थिरकणारी बोटे, तालावरची पकड सर्वांनाच अद्वितीय आनंद देऊन गेली. त्यांनी गत, तोडे, पेशकार सादर करीत रसिकांच्या भरभरून टाळ्या घेतल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन रानडे यांनी केले. तत्पूर्वी, कथक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांच्या तीन दिवसीय कथक कार्यशाळेचा आज समारोप झाला. त्यांच्या हस्ते सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यशाळेत तबल्यावर राम ढोक, संवादिनीवर संदीप गुरुनुले व गायनासाठी मंजरी वैद्य यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता गर्गे यांनी केले.


11:12 AM | 1.4KB/s
AXIS BANK
Found something you like?
Apply Now
at a cashback* of up to 5%
जाहिरात Axis Bank IN
Apply Now
Home / नागपूर
नागपूर
डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कथक साधना' 28 पासून
Mybhumi News · December 24, 2021 0 5
Add My Bhumi News to Home screen


11:08 AM | 138KB/s
Breaking Now उद्धव ठाकरे मुंबईचे मुख्यमंत्री कि राज्याच
खास विदर्भ
'कथक साधना' स्मृती स्मरणिकेचे थाटात प्रकाशन
December 30, 2021 Team Shankhnaad NAGPUR
Share This News
कृष्णांगी' नृत्यनाटिकेने रसिक भारावले
नागपूर, 29 डिसेंबर
डॉ. साधना नाफडे यांचे व्यक्तिमत्व शास्त्रीय नृत्य शिकणा-या सर्वांसाठी प्रेरणादायी होते. त्यांचे कामाप्रती असलेले समर्पण वाखाणण्यासारखे होते. साधनेच्या त्या उत्तम प्रतिक होत्या. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कथक साधना' स्मरणिका प्रकाशित


11:09 AM | 238KB/s
NAGPURINFO
ONLINE NEWS & TELEVISION
WhiteHat Jr.
मर्यादित जागा शिल्लक आहेत.
उघडा
डॉ. नाफडे साधनेचे प्रतिक होत्या - पं. राजेंद्र गंगाणी
December 30,2021
नागपूर, 30 डिसेंबर : डॉ. साधना नाफडे यांचे व्यक्तिमत्व शास्त्रीय नृत्य शिकणा-या सर्वांसाठी प्रेरणादायी होते. त्यांचे कामाप्रती असलेले समर्पण वाखाणण्यासारखे होते. साधनेच्या त्या


वनिता विश्व

पं. राजेंद्र गंगाणी यांची 'कथक साधना' नृत्य कार्यशाळा

December 6, 2021 Team Shankhnaad NAGPUR

Share This News

नागपूर, 6 डिसेंबर
निर्झर कला संस्थान, गुरू साधना फाउंडेशन व संस्कार भारती, नागपूर यांच्या संयुक्तवतीने कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कथक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 28 ते 30 डिसेंबर दरम्यान होणा-या या कार्यशाळेला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथक नर्तक गुरू पं. राजेंद्र गंगाणी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.





डॉ. साधना नाफडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कथक साधना' २८ पासून

December 26, 2021 sattadheesh 0 Comments

**तीन दिवसीय कार्यक्रमात कार्यशाळा व स्मरणिकेचे प्रकाशन**

**नागपूर, २२ डिसेंबर: भारतीय शास्त्रीय नृत्याच्या प्रचार व प्रसारक, कथक गुरू डॉ. स्व. साधना नाफडे** यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ **'कथक साधना'**

Prepared & executed by

Ist floor, Prabhakar Apartment, Near
Patanjali Megastore, Pratap Nagar,
Nagpur – 22
www.squaremediasolutions.in
squaremediasolutions2019@gmail.com
8087001241,8975767173